# बृहन्मुंबई महानगरपालिका

## प्रकरण - १

**केंद्र शासनाचा माहितीचा अधिकार अधिनियम , २००५.**

कामकाजाबाबतची माहिती पुस्तिका

## उपप्रमुख अभियंता

## (पाणी पुरवठा प्रकल्प)

## नियोजन व संकल्प चित्रे

(दिनांक ३१.१२.२०२३ पर्यंत सुधारित)

**प्रस्तावना**

**<u>पाणी पुरवठा प्रकल्प विभाग</u>**

सन १९७० मध्ये जलस्त्रोतांमध्ये वृध्दी करण्यासाठी या विभागाची स्थापना करण्यात आली. नंतर प्रकल्प विभाग असे संबोधण्यात आले तर १९७२ पासून या विभागाला पाणी पुरवठा प्रकल्प विभाग (पा.पु.प्र.) असे नाव देण्यात आले.

मुंबईच्या वाढत्या लोकसंख्येमुळे पाण्याची स्थानिक मागणी वाढली व त्यामुळे मुंबई शहराच्या पाणी पुरवठयात वाढ करण्यासाठी पाणी पुरवठा योजना हाती घेण्याची आवश्यकता भासली ह्या योजनांच्या विविध प्रकल्पांच्या पूरक बाबींच्या नियोजन, संकल्पचित्रे व निविदा संबंधी १९७० सालच्या जवळपास उपप्रमुख अभियंता (पाणी पुरवठा प्रकल्प) नियोजन व संकल्पचित्रे यांच्या अधिपत्याखाली वेगवेगळया विभागाची स्थापना करण्यात आली. उपप्रमुख अभियंता (पाणी पुरवठा प्रकल्प) नियोजन व संकल्पचित्रे यांना पाच कार्यकारी अभियंता (नि.व सं.चित्रे) हे सहाय्य करीत आहेत.

पाणी पुरवठा प्रकल्प विभागातर्फे अंमलबजावणी केल्या जाणा-या स्थानिक पाणी पुरवठयाच्या वाढीसाठी आणि वितरणासाठी आवश्यक असणारी विविध कामे जसे नविन जलवाहिन्या टाकणे, सेवा जलाशयांची संरचनात्मक दुरुस्ती /पुनर्बांधणी करणे तसेच त्या अनुषंगाने येणारी विविध कामे इत्यादींचे नियोजन, व संकल्पचित्रे तयार करणे व निविदा मागविणे हे या विभागाचे उद्दिष्ट आहे.

पाणी पुरवठा प्रकल्प विभागाचा संरचनात्मक तक्ता तसेच जनतेला हवी असलेली विभागाची तपशीलवार माहिती संबंधित अधिका-यांकडून सोबत जोडलेल्या पुस्तिकेमध्ये (मॅन्युअल) उपलब्ध केली गेली आहे.

प्रमुख अभियंता (पाणी पुरवठा प्रकल्प) कार्यालयात चालू असलेली कामे तसेच विविध प्रकल्पांचे संनियंत्रण केले जाते.

| अ. क्र. | कार्यालयाचे नांव | उपकार्यालयाचे नांव/ नांवे | उप कार्यालयाचा पत्ता | उपकार्यालयाच्या प्रमुखाचे नांव व हुद्दा | उपकार्यालय प्रमुखाच्या कार्यालयाचा दूरध्वनी क्रमांक |
|---|---|---|---|---|---|
| १ | प्रमुख अभियंता (पाणी पुरवठा प्रकल्प) | उपप्रमुख अभियंता (पाणी पुरवठा प्रकल्प) नियोजन व संकल्पचित्रे | बृहन्मुंबई महानगरपालिका अभियांत्रिकी केंद्र, पहिला मजला, डॉ.ई.मोझेस रोड, वरळी नाका, वरळी, मुंबई- ४०० ०१८. | श्री.पां.बि.बंडगर, उपप्रमुख अभियंता (पाणी पुरवठा प्रकल्प) नियोजन व संकल्पचित्रे (दि.१५.११.२०२३ पर्यंत)<br><br>श्रीम. कल्पना अमित राऊळ उपप्रमुख अभियंता (पाणी पुरवठा प्रकल्प) नियोजन व संकल्पचित्रे (दि.१६.११.२०२३ पासून) | २४९५८००१ २४९५८१०१ विस्तारीत ८०४१ |

**सही /- ०९.०५.२०२४**

**उप प्रमुख अभियंता (पा.पु.प्र.) नि.व.सं.चित्रे**